# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ३९४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०९/०७/२०१६.

**१) पैश्यासाठी विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देवुन जिवे ठार मारले. :—**

दिनांक ८/७/२०१६ रोजी १५.५० वा. पुर्वी मृतक वय २८ वर्ष ही फिर्यादी दिघांबर विठोबा राऊत वय ५३ वर्ष रा. खोडशिवनी यांची मुलगी आहे. आरोपी क्र. १ पती व आरोपी क्र. २,३,४,५ हे सासु, सासरे, दिर व ननंद आहेत. मृतक ही पाणी गरम करण्याकरीता चुल पेटवित असतांना बाजुला ठेवलेल्या दिव्याने तिच्या साडीच्या पदराला आग लागुन मृतक ही जळाली. तिला औषधोपचार करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले होते. उपचारा दरम्यान ती मरण पावली. मृतकच्या घरच्या लोकांनी मृतकला माहेरून २,००,०००/—रू. आण म्हणुन शारीरीक व मानसिक त्रास देवुन जाळुन जिवे ठार मारले. असे फिर्यादीने आरोपीतांवर संशय घेवुन पोलीस स्टेशनला तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ४९८(अ),३०४(ब),३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**२) शुल्लक कारणावरून गुप्ती सारख्या चाकुने वार करून जिवे मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ०८/०७/२०१६ रोजी ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी धनंजय मारोती बन्सोड वय ४५ वर्ष रा. रवीदास वार्ड तुमसर यांची मुले स्वयंपाक खोलीत चहा बनवीत असतांना बळबळ करीत होते. आरोपीने फिर्यादीला तुझी मुले मला चिडवीतात असे म्हणुन फिर्यादीसोबत भांडण केले व फिर्यादीचा लहाण मुलगा दिपक बन्सोड वय १० वर्ष याच्या डाव्या मांडीवर गुप्ती सारख्या चाकुने वार करून दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) अवैध दारू अडयांवर धाडी. :—**

दिनांक ०८/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा साकोली व पवनी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०१ लिटर २६० मिली. देशी दारू कि. ५००/—रू. व जुगारातुन कि.१५७०/—रू असा एकुण कि. २०७०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.